# ''Tequila - टकाटक''

**मराठी NRI व ex-NRI लोकांनो, ''लेखण्या मोडा बंदुका हाती घ्या!''**

घाबरू नका, सर्जनशील लेखकांनो, मला तुमच्याकडून झणझणीत, चमचमीत आणि परखड मते असणारे 'विचारप्रवर्तक', प्रक्षोभक लघुलेख हवे आहेत!

मित्र-मैत्रिणींनो, मला खात्री आहे की तुमच्याकडे असा (किमान एक तरी!) विषय आहे की ज्याबद्दल तुम्ही पोटतिडिकेनी बोलता. तो तुमच्या 'passion' चा विषय आहे. तो विषय आला की तुम्ही बोलत राहता; लोकं ऐकत राहतात! मला अशा 'तुमच्या खास' विषयावर लघुलेख हवा आहे. शब्दमर्यादा साधारण १००० शब्द म्हणजे फुलस्केप पानाच्या ३-४ बाजू. अशा लघुलेखांचा संग्रह 'ग्रंथाली' पुस्तकरूपाने एप्रिल २००९ मध्ये प्रकाशित करेल.

लघुलेख शक्यतो मराठीतून असावा पण इंग्रजी/हिंदी मधूनही चालतील. जगभरातून व भारतातून आलेल्या लघुलेखांतून ४०-५० लेख त्यांतील भाषेचे माध्यम व भाषासौंदर्यापेक्षा त्यात व्यक्त झालेल्या तळमळ, मळमळ (passion) व अभिव्यक्तीच्या ताकदीवरून निवडले जातील.

| | | |
|---|---|---|
| **संकल्पना व संयोजन** | : | **डॉ. भूषण केळकर** |
| **संपादन समिती** | : | **सुधीर गाडगीळ** |
| | | **अविनाश धर्माधिकारी (IAS)** |
| | | **अपर्णा वेलणकर** |
| **भाषांतर** | : | **मंजिरी धामणकर** |
| **प्रकाशक** | : | **'ग्रंथाली', मुंबई** |

**लघुलेख पाठवण्याची अंतिम तारीख : १ नोव्हेंबर २००८**

'खास' विषय या सदरात वादग्रस्त विषय येऊ शकतात. उदा. आरक्षण असावे की नाही, मराठी मंडळातील हेवेदावे, 'Dating', भारतातील TV मालिका, Bollywood, क्रिकेटचा पगडा, अमेरिकेचा दुटप्पीपणा, भारतातील भ्रष्टाचार, २०२० मधला महासत्ता भारत, आत्ताच्या सामाजिक-राजकीय घडामोडी इ. इ. 'खास' मध्ये निस्सीम आवडही येऊ शकते. उदा. भारतीय संगीत, पाश्चात्य शिस्त व professionalism संदीप खरेची कविता, सचिनचे क्रिकेट इ. इ. 'खास' मध्ये एखादा आमूलाग्र बदल करणारा - जगावेगळा व्यक्तिगत - कौटुंबिक अनुभव असेल वा परदेशात भावलेली एखादी अफलातून रीत-पद्धत वा कल्पना!

'खास' विषय काहीही असो पण तो 'Shock Value', असणारा वाचकांना नवीन वाचल्याचं समाधान देणारा, विचारात पाडणारा, चटका लावणारा, भीडभाड न ठेवता टोकाची भूमिका मांडणारा (म्हणून 'टकाटक') आणि 'चढलेल्या -high' अवस्थेत लिहिला आहे असे वाटावे (म्हणून पहिल्या 'धारे'ची Tequila) असा मेंदूला झिणझिण्या आणणारा असावा. 'Tequila-टकाटक' चा निकष तुमच्या विचारातला व लिखाणातला 'तडका' असेल.

**भाषा - इंग्रजी/मराठी/हिंदी कुठलीही असली तरीही तुमचा खास 'touch' त्यामधे प्रगट व्हावा!!**

लक्षात असू द्या, मला 'वरणभात' लेख नको आहेत, झणझणीत - ठसका लावणारी - तडका मिसळ हवी आहे! चला तर, आपल्या ~~लेखण्या~~ बंदुका सरसावा, आणि प्रकल्पात सहभागी व्हा!!!

# ‘Tequila - टकाटक’ प्रकल्पाचा अधिक तपशील

- ☛ या प्रकल्पात फक्त NRI वा ex-NRI मराठी लेखकच भाग घेऊ शकतील.
- ☛ लघुलेखाला विषयाचे बंधन नाही परंतु जो विषय निवडाल तो तुमच्या passion चा हवा.
- ☛ लघुलेखाची शब्दमर्यादा साधारण १००० (३-४ फुलस्केप बाजू).
- ☛ लघुलेखाचे माध्यम मराठी-इंग्रजी-हिंदी कोणतेही चालेल. जर इंग्रजी-हिंदी मधील लेख निवडला गेला तर त्याचे मराठी भाषांतरच पुस्तकात समाविष्ट होईल.
- ☛ लेखांची निवड व पुस्तकासाठी योग्य बदल सुधीर गाडगीळ, अविनाश धर्माधिकारी व अपर्णा वेलणकर यांसारखे NRI लोकांनाही परिचित असणारे साहित्य क्षेत्रातील नामवंत व लोकप्रिय संपादक करतील.
- ☛ एक व्यक्ती कितीही लेख पाठवू शकेल.
- ☛ लेखासोबत पूर्ण पत्ता, फोन, e-mail पाठवावे.
- ☛ प्रत्येक लेखासोबत स्पर्धाशुल्क (non-refundable) पाठवणे आवश्यक आहे. या स्पर्धात्मक प्रकल्पाचे आंतरराष्ट्रीय स्वरूप लक्षात घेता, त्याची जाहिरात व संवाद-संपर्काचा खर्च लक्षात घेता माहिती, स्पर्धाशुल्क व लेख खालीलपैकी कुठेही पाठवावे.
- ☛ लघुलेख मिळण्याची अंतिम तारीख १ नोव्हेंबर २००८ राहील.

**भारतात :**

पत्ता : **८, ॐ कृष्ण कुंज, १२२/२, एरंडवणा, पुणे - ४११००४**
फोन : **०९४२२३१०३००, (०२०)६४००२८९०**

स्पर्धा शुल्क : **(a) रु. ६५० चा demand Draft payable @ Pune.**
(प्रत्येक लेखाला) **Payable to : 'Bhooshan Kelkar.'**

**(b) फक्त Senior Citizen / full time students साठी रु. ४५०. चा demand Draft.**

**अमेरिकेत :**

पत्ता : **25, Boonstra Drive, Wayne, NJ 07470. USA.**

फोन : **001 - 973 - 956 - 5672.**

स्पर्धा शुल्क : **(a) $ 15 payable to 'Bhooshan Kelkar'**
(प्रत्येक लेखाला) **(b) Senior Citizen / full time students only $ 10 payable to 'Bhooshan Kelkar'.**

- ☛ लघुलेखांची निवड झाली नाही तरीही स्पर्धाशुल्क परत केले जाणार नाही. (Non-refundable entry fee).
- ☛ सर्व स्पर्धकांना, निवड झालेल्या व न झालेल्या सुद्धा, पुस्तकाची एक प्रत Complimentary पाठवली जाईल.
- ☛ **अधिक माहितीसाठी संपर्क :** **"bhooshankelkar@hotmail.com"**